## प्रकरण चौथे

# ‘समिधा’ मधील समाजदर्शन

## प्रकरण चौथे

# ‘समिधा’ मधील समाजदर्शन


प्रास्ताविक

१. साहित्य व समाजजीवन यांचा परस्पर संबंध

२. ‘समिधा’ मधील समाजदर्शन

 २.१ अस्पृश्यतेचे चित्रण

 २.२ अन्याय, अत्याचाराचे चित्रण

 २.३ दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण

 २.४ अवमानित वागणूकीचे चित्रण

 २.५ ‘समिधा’मधील दलित स्त्रीचे जीवनचित्रण

३. ‘समिधा’ मधील धार्मिक जीवन

४. ‘समिधा’ मधील आर्थिक परिस्थिती

५. ‘समिधा’ मधील राजकीय परिस्थिती

६. ‘समिधा’ मधील शैक्षणिक परिस्थिती

समारोप


----

## प्रकरण चौथे

# 'समिधा' मधील समाजदर्शन

### प्रास्ताविक

'समिधा' या कादंबरीत चित्रित झालेल्या समाजजीवनाचे चित्रण याचा अभ्यास व विश्लेषण हा मुख्य हेतू या प्रकरणाचा आहे.

रणजित देसाई यांची दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी 'समिधा' (१९७९) ही कादंबरी एकूण दलित साहित्यात लक्षणीय ठरल्याचे दिसते. ही कादंबरी ग्रामीण तसेच दलित सीमारेषेवरील एक घटनाप्रधान कांदबरी आहे. 'स्वामी' व 'श्रीमान योगी' सारख्या ऐतिहासिक कलाकृती निर्माण केल्यानंतर त्यांचे लक्ष दलितांकडे वळले. त्यांचे जीवन जवळून पाहिले, ऐकले व अनुभवले म्हणूनच त्यांनी 'बारी' ही बेरड समाजावर आधारित पहिली दलित कादंबरी लिहिली. त्यानंतर त्यांनी 'समिधा' ही दुसरी दलित कादंबरी लिहिली.

शहरापेक्षा ग्रामीण भागातील समाजजीवन हे फारच गुंतागुंतीचे असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात जात-पात, धर्म, रूढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा यांचा पगडा समाजावर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. तसेच तेथे अस्पृश्यताही मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. याचे कारण म्हणजे तेथील निरक्षरता. अशिक्षितपणामुळे त्यांच्या मनात एखाद्या गोष्टीविषयी न्यूनगंड निर्माण होत असतो. दलित समाजाकडे सवर्णांची पाहण्याची दृष्टी ही मागासलेपणाची व हीनतेची असल्याचे दिसते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील दलित पिढी ही सवर्णांची कामे आपले कर्तव्य समजून पार पाडत होती. सवर्ण त्यांच्याकडून घाणेरडी कामे करवून घेत आणि त्यांना हीनतेची, अपमानास्पद वागणूक देत होते. ही दलित पिढी सवर्णांकडून होणारे अन्याय-अत्याचार मुकाट्याने सहन करत होते. बलुतेदारीची सर्व कामे हे सवर्ण लोक त्यांच्याकडून करवून घ्यायचे. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र ही परिस्थिती बदलल्याचे दिसून येते. डॉ. आंबेडकरांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या संदेशामुळे दलित तरुण शिकून सुशिक्षित झाला आणि त्याला आत्मभान आले. सवर्णांमुळे दलित समाजाला अजूनही गुलामीचे आणि लाचारीचे जीवन जगावे लागत आहे. घटनेने मिळवून दिलेले राजकीय व सामाजिक अधिकार हे कागदापुरतेच मर्यादित राहिले आहेत. कारण नवीन स्वातंत्र्योत्तर दलित पिढी जेव्हा गावगाड्याची कामे करण्यास नकार देते तेव्हा संघर्ष निर्माण होतो. परंपरागत चालत आलेल्या अन्याय-अत्याचाराला विरोध करणाऱ्या दलितांना कोणत्या प्रकारच्या संकटांना सामोरे जावे लागते याचे चित्रण रणजित देसाई यांनी 'समिधा' या कादंबरीत केल्याचे दिसून येते.

लेखकाने 'समिधा' या कादंबरीत रानगाव या खेड्यातील दलित व सवर्ण यांच्यातील संघर्षाचे चित्रण केले आहे. ग्रामीण भागातील सवर्ण व्यक्ती दलितांना कोणता त्रास देतात, त्यामुळे त्यांचे जगणे कसे मुश्किल होते, याचे वास्तवदर्शन घडविण्यासाठी दलित व सवर्ण समाजातील ब्राह्मण, मराठा, वाणी व जैन जातीतील लोकांचे तसेच हिंदू, ख्रिश्चन, मुस्लीम व जैन या धर्मातील लोकांचे वर्णन केले आहे.

रानगाव हे ग्रामीण भागात असल्याने तेथे अस्पृश्यतेचे प्रमाण खूपच प्रमाणात दिसून येते. दलित स्त्रिया ह्या सवर्ण लोकांच्या भोगवस्तू आहेत असे त्यांना वाटते.

त्यामुळे दलित स्त्रियांनाही सवर्णांकडून मिळणारी हीनतेची, नीचतेची वागणूक लेखकाने मुक्ता व शेवंताच्या व्यक्तिरेखेतून चित्रित केली आहे. कादंबरीचा नायक तुका हा स्वातंत्र्योत्तर दलित पिढीतला तरुण आहे. त्याला व त्याच्या कुटुंबाला तसेच रानगावातील संपूर्ण दलित समाजाला रानगावचा सरपंच व त्याची चांडाळ चौकडी हे सवर्ण लोक कोणत्या प्रकारचा त्रास देतात याचे चित्रण लेखकाने या कांदबरीतून केले आहे. तुकाच्या व्यक्तिरेखेतून लेखकाने दलित समाजातील एका दलित तरुण पिढीचे चित्र रेखाटले आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'समिधा' या कादंबरीतील समाजदर्शनाचा अभ्यास करावयाचा आहे. परंतु त्यापूर्वी साहित्य आणि समाजजीवन यांचा परस्पर संबंध अभ्यासणे गरजेचे वाटते.

## १) साहित्य आणि समाजजीवन यांचा परस्पर संबंध :

ज्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणामध्ये व्यक्ती जन्माला येते, वाढते त्याचा परिणाम त्याच्या व्यक्तिमत्त्वावर होताना दिसतो. त्याचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे काम हे विशिष्ट सामाजिक पर्यावरणच करते. कितीही मोठा प्रतिभावंत असला तरी सामाजिकतेच्या प्रभाव-परिणामाखालीच त्याचे मन, बुद्धी, प्रतिभा, विचारसंवेदना आकारत असतात. व्यक्ती आणि समष्टी यांच्या अभेद्य संबंधाबाबत कुसुमावती देशपांडे लिहितात, ''मानवी अंतर्मनाच्या प्रवृत्ती, मनाच्या वेगवेगळ्या थरातील संघर्ष अत्यंत चित्तवेधक असणार खरे परंतु अखेर त्यापैकी बऱ्याच प्रवृत्ती, भोवतालच्या समाजरचनेचे एकंदर परिस्थितीने निर्माण केलेल्या असतात. व्यक्तीचे मन व समाजाची रचना यांच्या संबंधाचा विचार करू लागले की, कोंबडी व तिचे अंडे यांच्याविषयीच्या कूटप्रश्नाची आठवण होते.''[१] यावरून कोणत्याही

समाजाच्या साहित्यात त्याची सामाजिकता, संस्कृती प्रतिबिंबित झालेली असते असे निदर्शनास येते.

भोवतालची परिस्थिती आणि साहित्य यांचा अन्योन्य संबंध असतो. तेन एच्.ए. यांच्या मते, ''कोणतीही साहित्यकृती घेतली तरी ती केवळ कल्पनांचा खेळ किंवा उद्दिपीत मेंदूतून निघालेली एक क्षणिक लहर असत नाही. ती लिहिणारा साहित्यिक ज्या समाजात वावरतो त्या समाजाचा, त्याच्या देशाचा, त्या देशाचा इतिहास, भूगोल, संस्कृतीचा, तो लेखक ज्या काळात जगला त्या काळातील युगधर्माचा समावच्छेदेकरून त्याच्या कृतीवर परिणाम होत असतो आणि या सर्व घटकांचे परिशीलन केल्यानंतर त्या कलाकृतीचे सम्यक दर्शन होऊ शकते.''[२] यावरून तेन यांच्या मते साहित्याचा समाजजीवनाशी, पर्यावरणाशी तसेच पर्यावरणाचा लेखकाशी कशा प्रकारचा संबंध येतो, लेखक आणि त्याची कलाकृती यांच्यामधला दुवा हा समाज आहे आणि लेखक-समाज-साहित्यकृती या साखळीशिवाय कोणतीही लेखनप्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही हे स्पष्ट केले आहे.

मानवाचे विविध प्रकारचे व्यवहार, त्यांची नाती, त्यांचे परस्पर संबंध, त्यांच्या इच्छा, अपेक्षा, सर्व प्रकारच्या भावभावना व असंख्य मनोव्यापार यांच्याकडून घडणाऱ्या कृती-प्रतिकृती तात्पर्य मानवाचा आंतर्बाह्य वैयक्तिक आणि सामाजिक जीवन ही त्यांच्या तळाशी असलेली सामग्री आहे. या अफाट मानवी जीवनाने मंथन करून त्याच्या तळाशी असलेली सत्ये शोधून काढण्याचे कार्य कादंबरीकार करीत असतो. हे विशाल मानवी जीवन ही कादंबरीची सामग्री आहे, साहित्य आहे असे श्री.मा. कुलकर्णी आपल्या 'कादंबरीची रचना' या ग्रंथात म्हणतात.

अस्सल कलाकृतीत तत्कालीन जीवनार्थाचे संदर्भ असलेले दिसतात. लेखक विशिष्ट अनुभवांच्या माध्यमातून सर्व सार्वकालिक जीवनातील सत्याचा अविष्कार घडविण्याचा प्रयत्न करत असतो. माणसा-माणसातील परस्पर संबंधाचे स्वरुप यातून होणारे संपूर्ण जीवनदर्शन घडते. त्यामध्ये चित्रित झालेल्या घटना, व्यक्ती, वातावरण तसेच त्यांचे जीवन हे प्रत्यक्ष वास्तव असतेच असे नाही. परंतु त्यातून प्रत्यक्ष वास्तव जीवन नसले तरी जीवनाशी समांतर विश्व चित्रित झालेले असते.

'समिधा' या कांदबरीत रणजित दसोई यांनी सवर्ण लोक आपल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी दलितांना किती हीनतेची आणि अन्याय-अत्याचाराची वागणूक देतात याचे चित्रण केले आहे. दलित समाजातील स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील दलित पिढीचे चित्रण केले आहे. सवर्णाकडून होणारे अन्याय-अत्याचार स्वातंत्र्यपूर्व दलित पिढी मुकाट्याने सहन करते. परंतु स्वातंत्र्योत्तर दलित तरुण पिढी त्यांच्या अन्याय-अत्याचाराला, हुकुमशाहीला भीक न घालता त्यांच्याविरूद्ध बंड करून उठते. परंतु सवर्ण लोक त्यांचे प्रयत्नही हाणून पाडतात. लेखकाने दलित व सवर्ण यांच्यातील संघर्षाचे चित्रण अगदी वास्तवपूर्ण रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

स्वातंत्र्यपूर्व दलितांचे समाजजीवन व स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचे समाजजीवन, त्यांचे स्वभाव, वृत्ती, प्रवृत्ती त्यावेळची सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय तसेच सांस्कृतिक परिस्थिती यांचे समाजजीवनदर्शन प्रस्तुत कादंबरीत घडते. तसेच दलितांना सवर्णांनी दिलेली अपमानास्पद वागणूक,

स्त्रियांना दिलेले दुय्यम स्थान यामुळे तिच्या भाव-भावनांचा होणारा कोंडमारा याचे चित्रण लेखकाने 'समिधा' मधून केले आहे.

स्वातत्र्योत्तर काळात देशाला स्वातंत्र्य मिळूनही सवर्णांचे दलितांवर होणोर अन्याय-अत्याचार तसेच चालू आहेत. याचे दर्शन लेखकाने या कादंबरीतून घडविले आहे.

## २) 'समिधा'मधील समाजदर्शन :

'समिधा' ही रणजित देसाई यांनी दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी कादंबरी लिहिली आहे. ही कादंबरी ग्रामीण असल्याने रानगाव या खेड्यातील दलित व सवर्ण या समाजाचे चित्रण लेखकाने केले आहे. लेखकाने रानगाव या खेड्यातील दलित-सवर्ण संघर्ष चित्रित करताना रानगावातील दलितांचे जीवन, राहणीमान, विचार, त्यांची सण-उत्सव, जयंत्या साजऱ्या करण्याची पद्धत याचे वास्तवपूर्ण चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केल्याचा दिसून येतो. 'समिधा' मधून दलित आणि सवर्ण समाज चित्रित केलेला वाचताना ग्रामीण भागातील चित्र समोर उभे राहते.

लेखकाने कादंबरीची सुरुवात रानगाव येथील देवा महार या दलित व्यक्तीच्या कुटुंबापासून केली आहे. सवर्णांकडून दलितांचा होणारा जातीय, मानसिक तसेच शारीरिक छळ या कांदबरीतून चित्रित झाला आहे. देवाचे कुटुंब तसेच रानगावातील संपूर्ण दलित समाजाला येथील सवर्ण लोकांकडून होणारा छळ, अन्याय-अत्याचार याचे चित्रण या कादंबरीतून दिसून येते. देवाच्या कुटुंबाला जेव्हा रानगावचा सरपंच भगवंतराव देशमुख व त्याची चांडाळचौकडी हे सवर्ण लोक त्रास देऊ लागतात तेव्हा तुका त्यांच्याविरूद्ध लढण्यास प्रवृत्ती होतो. तुका ही या

कादंबरीची मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. या कादंबरीचे संपूर्ण कथानक तुकाभोवती फिरताना दिसते. तुका हा देवाचा कर्तृत्ववान, हुशार आणि जिद्दी असा एकुलता एक मुलगा आहे. तसेच स्वातंत्र्योत्तर पिढीतला आंबेडकरी विचाराने भारावून गेलेला एका नव्या पिढीतला एक दलित तरुण आहे. तुका जेव्हा या सवर्णांच्या विरोधात लढण्यास सुरु करतो तेव्हा हे लोक तुकाला सळो की पळो करून सोडतात. सवर्णांच्या हुकुमशाही व दादागिरीपुढे तुकाचे काहीही चालत नाही. तुका जेव्हा-जेव्हा त्यांच्या अन्याय-अत्याचाराला विरोध करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा-तेव्हा संघर्ष निर्माण होताना दिसतो.

'समिधा' कादंबरीचा नायक तुका हा आहे. तर नायिका मुक्ता ही तुकाची छोटी बहीण आहे. तुका आणि मुक्ता ही देवा महार या दलित व्यक्तीची दोन मुले आहेत. देवा हा पारंपरिक विचारांचा, जुन्या वळणाचा, जुन्या पिढीचा एक दलित आहे. त्यामुळे तो सवर्णांची पडेल ती सर्व कामे आपले कर्तव्य समजून करताना दिसतो, आणि आपल्या मुलानेही सवर्णांशी वैर न घेता ती करावीत असे देवाला वाटते. परंतु बापाचे हे मानहानीचे विचार तुकाला पटत नाहीत. तुका बापाचे काहीही न ऐकता सवर्णांकडून होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला बळी न पडता त्याला तोंड देण्याचा प्रयत्न करतो. यातून लेखकाने स्वतांत्र्यपूर्व दलित पिढी व स्वातंत्र्योत्तर दलित पिढीचे चित्रण केले आहे. स्वांतत्र्यपूर्व दलित पिढी ही सवर्णांच्या अन्याय-अत्याचाराला बळी पडणारी आहे. परंतु ही नवीन दलित पिढी बंडखोर, जिद्दी व कर्तृत्ववान असल्याचे दिसून येते.

देवाची पत्नी वारल्यानंतर तिच्या उत्तरकार्यासाठी देवाकडे पैसे नसतात. म्हणून देवा यशवंत खोराटे या सवर्ण व्यक्तीकडून व्याजावर शंभर रुपये घेतो.

देवाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे खोराटेकडून घेतलेले पैसे परत करणे वेळेवर जमत नाही म्हणून खोराटे त्या पैशाला व्याज लावून त्याच्या बदल्यात त्याची जमीन लाटतो. देवाच्या या प्रसंगातून त्यावेळच्या दलित समाजातील लोकांची असणारी बिकट आर्थिक परिस्थिती आणि त्या परिस्थितीचा त्यांच्या जीवनावर होणारा परिणाम लेखकाने चित्रित केला आहे.

'समिधा' या कादंबरीत ख्रिश्चन, हिंदू-मुस्लीम व जैन या धर्मातील लोकांचा समावेश केल्याने लेखकाने कादंबरीतील रानगाव या खेडेगावात चर्च, मशीद, महादेव मंदिर, जैन मंदिर याचे चित्र रेखाटले आहे. या सर्व धर्मातील मंदिरांच्या चित्रणामुळे लेखकाने 'समिधा' मध्ये चित्रित केलेले रानगाव नजरेसमोर आल्याशिवाय राहत नाही. गावाच्या वेशीतच पिंपळकट्टा आहे. झाडाच्या सावलीत यशवंत खोराटे याचे 'अन्नपूर्णा' हे हॉटेल आहे. हॉटेल बाहेरच्या सिमेंटच्या खांबावर 'येथे बोलाईचे मटण मिळेल' आणि त्याच्या खाली 'येथे सर्व धर्मांच्या, सर्व जातींच्या माणसांना प्रवेश मिळेल' अशा दोन पाटया लावल्या आहेत. परंतु प्रत्यक्षात या कादंबरी वाचनानंतर असे दिसून येते की या दोन विधानापैकी दुसरे विधान पूर्ण चुकीचे आहे. कारण या कादंबरीमध्ये लेखकाने जातीय संघर्ष चित्रित केला आहे. दलित आणि सवर्ण यांच्यातल्या जातीय संघर्षाचे चित्रण लेखकाने 'समिधा' मधून केले आहे. अस्पृश्यतेमुळे हा जातीय संघर्ष निर्माण होताना दिसतो.

'समिधा' मधून लेखकाने ग्रामीण भागातील लोकांचे दलित व ग्रामीण वास्तव जीवनदर्शन घडविले आहे. ग्रामीण खेडेगावात गावचा पाटील, जैन, लिंगायत तेली, वाणी, मुस्लीम हया जातीचे लोक सोडून इतर गावातील बारा

बलुतेदार आणि त्यांचे व्यवसाय याचे वास्तवदर्शन घडविले आहे. महार, मांग, रामोशी, मराठा, तेली, वाणी, पुजारी, जैन, ख्रिश्चन, मुस्लीम या जातीतील लोकांचा समावेश या कादंबरीत लेखकाने केला आहे. महार समाजातील लोक सवर्णांची मेलेली जनावरे ओढून आणणे, लाकडे फोडणे तर रामोशी गावचे संरक्षण करणे आणि न्हावी आपला पारंपारिक व्यवसाय चालवताना दिसतो.

'समिधा'मध्ये देवाच्या व्यक्तिचित्रणातून स्वातंत्र्यपूर्व दलित पिढीचे चित्र रेखाटले आहे. देवाची पिढी ही जुन्या विचाराची, घाबरट स्वभावाची व पारंपारिक रूढी जोपासणारी असल्याने त्या पिढीतला प्रत्येक दलित हा सवर्णांची पडेल ती कामे आपले कर्तव्य समजून प्रामाणिकपणे करताना दिसतो. परंतु तुकाची पिढी ही स्वातंत्र्योत्तर काळातली, आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेली, आत्मभान आलेली नव्या विचाराची दलित तरूण पिढी आहे. या पिढीवर आंबेडकरांच्या चळवळींचा परिणाम झाल्याचे दिसून येते. तुका हा सवर्णांच्या हुकूमशाहीला न जुमानता समाजात ताठ मानेने जगण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्या समाजातील प्रत्येक व्यक्तीने असेच वागावे असे त्याला वाटते. त्याकरिता तुका आपल्या काकांच्या मदतीने आपल्या समाजात बरेच बदल घडवून आणतो. समाजासाठी तक्क्या बांधून देतो.

समाजातील लोकांनी बलुतेदारीची कामे सोडून घ्यावीत म्हणून त्यांना रोजगार उपलब्ध करून देतो. त्यांनीही माणसाप्रमाणे रहावे, वागावे असे तुकाला वाटते. समाजात सण, उत्सव, जयंत्या मोठया उत्साहात साजऱ्या करतो. परंतु यामध्ये तो स्वत:चा बाप व बहिणीची आंब्रू गमावून बसतो.

हक्कासाठी लढणाऱ्या एका दलित तरूणाचा सवर्णांनी केलेला छळ, अन्याय अत्याचार आणि त्यातून निर्माण झालेल्या दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण लेखकाने 'समिधा'मधून केले आहे.

'समिधा' मधून एका दलित स्त्रीच्या जीवनाची वाताहत मुक्ताच्या माध्यमातून चित्रित केली आहे. दलित स्त्री म्हणजे केवळ सवर्णाची एक भोगवस्तू असून तिला समाजात कोणत्याही प्रकारचे स्थान नसल्याचे चित्रित केले आहे. मुक्ता ही दिसायला सुंदर, हुशार व जिद्दी स्वभावाची आहे. ती सुशिक्षित असून नर्सची नोकरी करते आणि स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा आटोकाट प्रयत्न करते. परंतु सवर्ण हे तिच्या देखणेपणाचा आणि ताठर स्वभाव हाणून पाडण्याचा प्रयत्न करतात. आणि शेवटी तिच्यावर बलात्कार करून तिला बेअब्रू करतात. कोर्टातदेखील पैशाच्या आणि वशीला यांच्या जोरावर तिलाच दोषी ठरवून स्वत:ची निर्दोष मुक्तता करून घेण्यात यशस्वी होतात. तसेच शेवंताच्या व्यक्तिचित्रणातून एका दलित व्यभिचारी स्त्रीचे चित्रण केले आहे. लग्न होऊनही ती सवर्णांशी शारिरीक संबंध ठेवते. परंतु, तुका हा एक दिवस तिला भानावर आण्याचा प्रयत्न करतो.

लेखकाने 'समिधा'कादंबरीतून दलित समाजाचे वास्तव जीवन अगदीच विचारपूर्वक रेखाटल्याचे दिसून येते. देशाला स्वातंत्र्य मिळूनही दलित समाजाला सवर्णांकडून दिल्या जाणाऱ्या अपमानास्पद वागणुकीचे चित्रण अगदी स्पष्टपणे मांडण्याचा आटोकाट प्रयत्न लेखकाचा दिसून येतो. यावरून लेखकाला सूचित करायचे आहे की, देशाला स्वातंत्र्य मिळूनही सवर्णाचे दलितांवर होणारे अन्याय अत्याचार अजून चालूच आहेत.

अशा प्रकारे 'समिधा' मधील दलितांचे सामाजिक आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय जीवन या कादंबरीतून लेखकाने चित्रित केले आहे.

**२.१ अस्पृश्यतेचे चित्रण**

सवर्ण लोक दलितांच्यावर नेहमीच अन्याय अत्याचार करत असतात. त्यांना माणसासारखे जगू न देता एखादया पशूपेक्षाही बेकार वागणूक सवर्ण लोक दलितांना देत असतात. रणजित देसाई यांनी 'समिधा'मध्ये केलेले अस्पृश्यतेचे चित्रण हे अगदी वास्तव भासल्याखेरीज राहत नाही. त्यांनी अस्पृश्यतेच्या घटना-प्रसंगांची मांडणी अगदी सुरेख केली आहे. रानगाव हया ग्रामीण खेडयातील सवर्णीय लोक अस्पृश्यता पाळताना दिसतात. त्यांचे रेखाटन लेखकाने 'समिधा' कादंबरीतून केले आहे.

'समिधा' मधील देवा महार हा जेंव्हा यशवंत खोराटेच्या हॉटेलात जातो तेंव्हा हॉटेलात काम करणाऱ्या बाबू नावाच्या पोराला म्हणतो.

''त्याला कप विसळायला पाणी दे आणि एक चहापाव दे

तत्परतेने बाबू पाण्याची तवली घेऊन आला दाराशी ठेवलेला कप देवानं उचलला. बाबून टाकलेल्या पाण्याने विसळला. बाबू चहाची किटली घेऊन येईपर्यंत देवा कप घेऊन दारात उभा होता.''[३] यावरून दलित समाजाला दिलेली अपमानित, हीनतेची, अस्पृश्यतेची वागणूक दिसून येते हे पाहून रामभाऊ तलाठी यशवंत खोराटेला म्हणतो की, ''आता कायदे बदलल्यामुळे हरिजनांना असे वागवता येणार नाही.'' यावर खोराटे रामभाऊ तलाठयाला म्हणतो की, ''भाऊसाहेब, कायदे बदलले. धंदा बदलला नाही. ज्या कपातनं देवा चहा प्याला,

त्या कपातनं तुम्हाला चहा चाललं? धंदा बसंल माझा."[४] यावरून 'समिधा' मधून दलितांविषयीचा संकुचित दृष्टीकोन दिसून येतो. तत्कालीन समाजामध्ये सवर्ण हे दलितांना हीनतेची, पशुपेक्षाही खालच्या पातळीवरची वागणूक देत होते हे'समिधा'मधून चित्रित केलेआहे. होळीच्यावेळी हरिजन मंडळी जेव्हा होळी खेळायचे ठरवतात तेंव्हा त्यांना खेळाची अडचण वाटते. तेव्हा ते सर्वजण मिळून सरपंचाच्या वाड्यात आंघोळीला तुकासोबत जातात. आणि धुळवड खेळल्यानंतर आंघोळीला पाणी नाही. तालीत आंघोळ केली असती. परंतु अगोदरच तालीचं पाणी नासत आलंय आणि पाणी गावातल्या विहिरीचं प्यालं पाहिजे असे म्हणतात. इतक्यात बंडू पुजारी रागाने म्हणतो की, "शिंच्यानो ! गावातल्या हिरीचं पानी मागताय ? मग देवाला कुठल्या पाण्याने अभिषेक करायचा?"[५] यावरून दलितांना किती हीनतेची वागणूक दिली जाते आणि तत्कालीन दलित समाजातील लोकांना गावातील विहीरीचे, नळाचे पाणी दिले जात नव्हते, मंदिरात प्रवेश नव्हता आणि अस्पृश्यता पाळली जात होती हे चित्रण या कादंबरीतून दिसते.

तुका जेव्हा विश्वासराव यांना पिणाच्या पाण्याची ताल दाखवितो तेव्हा त्यामध्ये मेलेलं कुत्रं फुगून तरंगत होते. ते पाहून विश्वासराव गावकऱ्यांना व सरपंच भगवंतराव यांना शिव्या घालून म्हणतात की, देश स्वतंत्र होऊन इतकी वर्षे झाली, कायदे बदलले आणि त्याची अंमलबजावणी अशी करता? आणि दुसऱ्या दिवसापासून गावची विहीर हरीजनांसाठी खुली ठेवण्यास साांगतात तेंव्हा बंडू पुजारी म्हणतो की, "पण गावच्या जैन, लिंगायत, ब्राह्मणांनी कुठलं पाणी प्यावं?"[६] यावरून 'समिधा' कादंबरीतील अस्पृश्यतेचं चित्र दिसून येते.

## २.२ अन्याय – अत्याचाराचे चित्रण

रणजित देसाई यांनी 'समिधा' या कादंबरीमध्ये सवर्णांकडून दलितांच्यावर होणाऱ्या अन्याय -अत्याचाराचे चित्रण केले आहे. देवा महार यांच्या शेतात तुका म्हणजे देवाचा मुलगा पिकाची राखण करताना देशमुखाची गाय पिकात जाते तेव्हा तुका तिला हंबडायला सांगतो. पण सत्तु रामोशी त्याला दम देतो. म्हणून तुका रागाने पिकातली देशमुखाची गाय हाकलून लावतो. परंतु सत्तु रामोशी व रामा रखवाल्या सरपंच भगवंतराव याला तुकाने गायीला धोंडा मारला म्हणून सांगतात आणि या कारणाचा बदला म्हणून देशमुख तेल्याची, जैनाची व आपली जनावर देवाच्या पिकात घालून भरघोस पिकाची वाट लावतो. तेव्हा देवा तुकाला सांगतो की, म्हाराचा खडा हा गावातील लोकांना धोंडा वाटतोय. देशमुख जाणूनबुजून देवाच्या तोंडाशी आलेल्या पिकाची वाट लावतात. यावरून सवर्णांची दलितांसोबतची दादागिरीची वागणूक चित्रित होते.

देवाने पत्नीच्या बारा दिवसाकरिता यशवंत खोराटेकडून शंभर रूपये घेतलेले असतात. तेव्हा यशवंत खोराटे काही दिवसानंतर देवाची जमीन आपल्याकडे गहाण ठेवून घेतो. तुका मुंबईहून परत आल्यानंतर ती जमीन परत घेण्यासाठी खोराटेक्डे जातो तेव्हा खोराटे त्याला 'म्हारडं' म्हणून शिवी देतो आणि व्याजाचे पैसे मागतो तेव्हा तुका स्वत: शेत करायचं म्हणून शेत नांगरण्यासाठी म्हादू सुतार आणि तानाजी भोसल्याची औतं घेऊन येतो. परंतु तेदेखील खोराटेच्या सांगण्यावरून दुसऱ्या दिवशी येत नाहीत. तेव्हा तुका वाडीला जाऊन भोइट्याची बैलजोडी घेऊन येतो व शेत नांगरून पेरायला तयार करतो. यावरून सवर्ण हे दलित समाजातील लोकांच्या इच्छा-अपेक्षांना कशा प्रकारे हाणून पाडण्याचा प्रयत्न करतात याचे दर्शन घडते.

लेखकाने 'समिधा' कादंबरीतून एका लाचार, दुबळया असलेल्या दलित समाजाचे दर्शन घडविले आहे. प्रत्येक ग्रामीण भागात गावगाडयाची व बलुतेदारीची पद्धत दिसून येते. 'समिधा'मध्ये देखील गावगाड्याचे व बलुतेदारीचे दर्शन घडते. बसवंत जैनाची म्हैस मेल्याची बातमी समजताच हरिजनवाडयातली हरिजन मंडळी ही बसवंत जैनाच्या घरासमोर गोळा होतात. तुका त्यांना काय चाललयं म्हणून विचारता देवा म्हणतो की, "सकाळदरनं बसलूया. शेवटचं पस्तीस रूपय सांगितलं तरीबी ऐकत नाही. पन्नास म्हतोय."[७] यावरून दलित समाजातील लोकांच्या लाचारीचे चित्रण दिसून येते. परंतु तुका बसवंत जैनाला आपली म्हैस ठेवून घ्यायला सांगतो आणि आपल्या लोकांना म्हणतो, "लाज वाटत न्हाई भडव्यांनो, ते मेलेल्या ढोरासाठी दारात आलासा ! सकाळदरनं दारात उपाशी बसलासा. हयो धा येळा जेवून खाऊन आला आसल. असलं जिनं जगण्याबिगार मरत का न्हाईसा?"............

"जगायचं तर माणूस म्हणून जगू, न्हाईतर उपाशी मरू. बाबा हे सांगून सांगून खपला पण तुमाला तेची लाज न्हाई."[८] यावरून लेखकाने स्वातंत्र्यपूर्व दलित पिढी आणि स्वातंत्र्योत्तर दलित पिढीचे चित्र रेखाटल्याचे लक्षात येते. स्वातंत्र्यपूर्व पिढी ही जुनी, पारंपरिक विचाराची असल्याने ते लाचारीचे जीवन जगणे मान्य करतात. परंतु स्वातंत्र्योत्तर दलित तरूण पिढी ही आंबेडकरी विचाराने भारावलेली आहे. त्यामुळे ती जुन्या चालीरिती, परंपरा मोडून काढून मानाने जगण्याचा प्रयत्न करणारी आहे, हे स्पष्ट होते.

## २.३ दलित–सवर्ण संघर्षाचे चित्रण

लेखकाने 'समिधा' या कादंबरीतून दलितांना सवर्णांकडून होणारा त्रास, अन्याय–अत्याचार व त्यांच्यातील संघर्षाचे चित्रण केले आहे.

तुका हा कादंबरीचा नायक जेव्हा चुलत्याकडे मुंबईला राहून येतो तेव्हा तो नवी जाणीव व आंबेडकरी विचार घेऊनच परत येतो. तेव्हा त्याला आपल्यावर व आपल्या समाजावर होणाऱ्या अन्याय–अत्याचाराची जाणीव होते. त्यामुळे तो आक्रमक भूमिका स्वीकारतो. दलित वस्तीत जागृती घडवून आणण्यासाठी धडपडतो आणि तिथूनच दलित सवर्ण संघर्षाला सुरूवात होते. गावचा सरपंच भगवंतराव देशमुख व त्याची चांडाळ चौकडीही पहिल्यापासूनच देवाच्या कुटुंबाला त्रास देताना दिसतात. तुकाचा स्वभाव सडेतोड तर देवाचा स्वभाव घाबरट असतो. सवर्णाचे म्हणणे देवा गुमान ऐकून घेतो. परंतु तुका त्यांच्या विरोधात लढत असतो. सवर्णाकडून होणारे अन्याय–अत्याचार सहन करून लाचारीचे जीवन देवा जगतो, परंतु तुकाला हे पटत नाही. त्यामुळे भगवंतराव व त्याची चांडाळ चौकडी तुकाला नेहमीच मागे खेचण्याचा प्रयत्न करते. यातूनच तुकाच्या हट्टी व जिद्दी स्वभावामुळे संघर्ष निर्माण होतो.

तुका जेव्हा मुंबईहून नोकरी करून परत येतो तेव्हा तो नवी जाणीव घेऊनच येतो. आपल्या समाजातील तरुणांना आपले आंबेडकरी विचार स्वीकारण्यास प्रवृत्त करतो. गावामध्ये बऱ्याच सामाजिक सुधारणा घडवून आणतो. समाजातील सर्व तरुणांना संघटित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्याचे ठरवितो. जयंती दोन दिवसावर आली असताना गावसभा बोलावतात. त्यामध्ये मिरवणूक कशी काढायची याचे नियोजन करतात. मिरवणूक प्रथम गावच्या फाट्याच्या

वेशीपासून सुरु करून प्रथम नेहरुंच्या पुतळ्याला हार घालून नंतर हरिजनवाड्यात डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला वंदन करून हार घातला जाईल आणि शेवटी महात्मा गांधींच्या पुतळ्याला हार घालून सभा फुटेल असे मिरवणूकीचे नियोजन सरपंच भगवंतराव करतात. परंतु तुका म्हणतो की, प्रथम हार डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याला. सरपंच होकार देतो. परंतु फक्त बाबासाहेबांच्या नावाचा जयजयकार झाला पाहिजे व मिरवणुकीत झेंडे येता कामाचे नाहीत अशी ताकीद सरपंच देतो. तेव्हा तुका म्हणतो की, झेंडे येणार या वादात मिरवणूक वेगवेगळी काढण्यात येते. मिरवणूकीच्यावेळी गांधीजींचा पुतळा उंचीवर असल्याने हार घालताना एका मुलाच्या हातून पुतळ्याचा हात तुटून खाली पडतो आणि तिथूनच खऱ्या संघर्षाला सुरुवात होते. गांधीजींच्या तुटलेल्या हाताकडे पाहताच भगवंतराव विचारतात की,

''कुनी केलं हे ?''

''त्या म्हारड्यांनी !'' एक नागरिक उसळला, ''तुमी सरपंच ! हार घालायच सोंग करून त्यांनी हात तोडला. द्या, त्यास्नी कर्ज द्या, मशिनी द्या, रोजगार हमी द्या, मराठा म्हणवून घेतासा आनी म्हारड्यांपुढं शेपूट घालतासा ! तुमच्या बाचा हात तुटला, काय करायचं सांगा ?''[९] अशा प्रकारे एक नागरिक सरपंचाला भडकावून ठेवतो व मिरवणूक परत काढण्याचे गावकरी ठरवतात व घोषणा करतात की,

''हात का बदला जान से लेंगेऽऽ''

'महारवाडा जाळून टाकाऽऽ'

'आंबेडकर मुर्दाबाद' [१०]

या घोषणेनंतर बाबासाहेबांच्या फोटोला डांबर फासतात व दलित वस्तीवर दगडफेक करतात. या दगडफेकीत तुकाचा बाप देवा गंभीर जखमी होतो. हरिजनवाडा जाळला जातो. तेव्हा शेवंताचा बाप विठू नाईक जळून खाक होतो. देवाही मरतो अशी दोन माणसं त्यामध्ये मृत्यूमुखी पडतात. तुकाला न्याय मिळण्यापेक्षा त्याच्यावर आरोप करून ते मोकळे सुटतात.

मुक्ता ही 'समिधा' या कादंबरीची नायिका. तुकाची बहीण. सरपंच व त्याची चांडाळ चौकडी तिच्यावर बलात्कार करतात. मुक्ता त्यांच्याविरूद्ध कोर्टात केस खेळते. परंतु तुकाला उमाप पैसा खर्च करूनही काही मिळत नाही. केसचा निकाल सवर्णांच्याच बाजूने लागतो.

अशा प्रकारे या सवर्णांच्या व दलितांच्या संघर्षामध्ये काही दलित स्त्रियांची अब्रू जाते. घरे जाळली जातात. तुका आपला बाप व बहिणीची अब्रू अशा दोन गोष्टी गमावून बसतो. अशा प्रकारचा संघर्ष लेखकाने चित्रित केला आहे.

## २.४ अवमानित वागणुकीचे चित्रण :

लेखकाने 'समिधा' कादंबरीतून सवर्णांकडून दिल्या जाणाऱ्या अवमानित वागणुकीचे दर्शन घडविले आहे. सवर्ण हे नेहमीच दलितांना नीच समजतात. वेळोवेळी संधी साधून त्यांचा अपमान करताना दिसतात. यशवंत खोराटे याने मळणी घातलेली असते. तिथे महार मंडळी जमा होतात. त्यांना यशवंत खोराटे म्हणतो, ''आयला या म्हारड्यांची आणि गिधाडांची जात सारखी । कुठली रास पडली की हे आलेच. भावक्याऽऽ.... ... ...''

'त्या माकडास्नी घाल ! नजर लागल कुठतरी राशीला' [११]

अशा प्रकारे अस्पृश्यांच्या,दलितांच्या स्पर्शाने, नजरेने अपशकून होतो, दृष्ट लागते असे सवर्ण समजतात याचे रेखाटन या कादंबरीतून आले आहे. अशीच एक म्हातारी भावक्याला चार दानं पदरात टाकं म्हणून विनवण्या करते. परंतु भावक्या तिच्या पदरात पान खाऊन पचकन थुंकतो आणि खोराटे म्हणतो की, 'त्या कुत्र्यांना हाकल', यावरून दलितांना दिल्या जाणाऱ्या अपमानास्पद वागणूकीचे वास्तवचित्रण 'समिधा'मध्ये आले आहे हे दिसते.

डॉ. जी.पी. माळी म्हणतात की, ''परंपरागत अन्याय-अत्याचाराला विरोध करणाऱ्या दलितांना कोणत्या प्रकारच्या संकटांना सामोरे जावे लागते याचे चित्रण रणजित देसाई यांनी 'समिधा' मध्ये केलेले आहे.''[१२]

अशा प्रकारे रणजित देसाई यांनी 'समिधा' मधील समाजदर्शन घडविले आहे. त्यातून त्यांनी तत्कालीन ग्रामीण व दलित समाजाचे जीवनचित्रण रेखाटले आहे.

## २.५ 'समिधा' मधील स्त्रीचे जीवनचित्रण

रणजित देसाई यांनी 'समिधा' मधील नायिका 'मुक्ता' च्या माध्यमातून तत्कालीन दलित स्त्रीचे जीवनचित्रण केले आहे. मुक्ताच्या व्यक्तिरेखेतून एका दलित स्त्रीच्या जीवनाची शोकांतिका व्यक्त केली आहे.

मुक्ता ही सुंदर, हुशार व महत्वाकांक्षी असल्याने अगदी गरीब परिस्थितीतही फादर जॉनच्या मदतीने दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करते व नर्सची नोकरी करते. ती दिसायला सुंदर असल्याने गावचा सरपंच तिच्यावर नजर ठेवून असतो. मुक्ताचा बाप मरतो तेव्हा भगवंतराव तिच्या घरी जातो व घरी कोणीही नाही हे पाहून तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न करतो परंतु भगवंतराव तिला जवळ ओढत

म्हणतो, ''माझं ऐक! मी तुझं घरदार बांधून देतो . तुला नोकरी दीन. माझी मर्जी सांभाळली तर कायबी कमी पडणार नाही तुला.......''

'आयला घरदार गेलं तरी ही मिजास! मुक्ते सांगून ठेवतो. एक दिवशी तुला खाली घातल्याबिगार ऱ्हानार नाही. तवा बोंबललीस तरी कोनबी ऐकायला येणार नाही.'[१३] यावरून एका दलित स्त्री जीवनाची व्यथा लक्षात येते. सवर्ण लोक दलित स्त्रियांना आपल्या गरजेची वस्तू समजून वागवतात हे स्पष्ट होते.

मुक्ता जेव्हा शेलारीच्या दवाखान्यात रूजू होते तेव्हा महिपतराव नागनाळे हे तिला पाहतात. तिला ते 'नवीन पाखरू' म्हणून बोलतात. नागनाळे मुक्ताशी कुठेही रस्त्यात उभं राहून बोलतो व तिच्याशी लगट करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढवतो. एके दिवशी महिपतराव तोंड वाकडं तिकडं करत दवाखान्यात येतात. आणि आपल्या पोटात दुखतय व मला तपासा असे मुक्ताला सांगतात डॉक्टर व्हिजीटला गेल्याचे सांगून मुक्ता त्यांना गोळ्या देते. तेंव्हा महिपतराव तपासणीच्या आधी गोळया नको म्हणतो. आणि मुक्ताला आपल्याला तपासायला भाग पाडतो. तपासताना नागनाळे अंगातलं धोतर वर करतो, म्हणून मुक्ता रागाने त्यांना निघून जाण्यास सांगते. नागनाळे तिला दीडदमडीची नर्स आणि ही मिजास काय म्हणून रागवतो व तिथून निघून जातो. परंतु डॉ. देवतळे तिला बोलावून घेवून विचारतात की, तुम्ही नागनाळेंना का हाकलात तेव्हा मुक्ता म्हणते की, ते चावटपणा करायला लागले. म्हणून त्यांना हाकलंल. तेव्हा मुक्ताला डॉ. देवतळे म्हणतात की, ''म्हणजे काय केलं ? तुम्हाला मिठीत घेतलं ? दाबलं ? का मुके घेतले ? नर्स म्हणून घेता असली लाज बाळगायची असेल तर नर्सचा धंदा सोडा. नागनाळे साधा माणूस नाही, त्याचे हात वरपर्यंत पोहोचलेत, तुमच्या नादानं मला त्रास होईल.

यापुढे असं वागू नका, जा तुम्ही.''[१४] यावरून दलित स्त्रीने आपले चारित्र्य हे मोफत वस्तूसारखे दुसऱ्यांना वापरायला देणे, त्याचा बाजार मांडणे दलित स्त्रीला सक्तीचे आहे असे रणजित देसाई यांनी चित्रित केल्याचे दिसून येते.

शेलारी गावी दवाखान्यात नर्स म्हणून येणाऱ्या प्रत्येक स्त्रिला त्या गावचा सरपंच वापरुन सोडतो. तसेच मुक्तानेही त्याला नकार देवू नये. अन्यथा तिच्या नोकरीवर परिणाम होईल असे डॉ. देवतळे दवाखान्याचे मुख्य डॉक्टर म्हणतात. यावरून एका सुशिक्षित दलित स्त्रीच्या जीवनाची कुचंबना, कोंडी लेखकाने व्यक्त केली आहे.

यानंतर मुक्ताची वसवड या गावी बदली होते. तिथेही असाच प्रसंग डॉ. कात्रे तिच्यावर आणतात. मुक्ता कशीबशी त्यांच्या तावडीतून स्वत:ची सुटका करून घेते. परत मुक्ताची शेलारी या गावीच बदली होते. दीड वर्षाच्या कालावधीत मुक्ताच्या चार ठिकाणी बदल्या होतात. तिच्या बदलीला रानगावचे सरपंच भगवंतराव व त्यांची चांडाळ-चौकडी आणि शेलारीचा सरपंच महिपतराव नागनाळे ही मंडळी कारणीभूत असतात. हे सर्वजण मिळून एक डाव खेळतात व त्यामध्ये ते एक दिवस यशस्वी होतात. एका रात्री मुक्ताला त्यांच्या प्लॅनिंगनुसार तोंडात बोळा कोंबून जीपमधून पळवून नेतात व गाडी आडवाटेने नेऊन एका जोंधळ्याच्या पिकाशेजारी थांबवतात आणि भर पिकात मोकळी जागा आधीच शोधून ठेवल्यामुळे मुक्ताला त्या जागेत नेऊन टाकतात. तेव्हा भगवंतराव म्हणतो की,

''आता खुशाल बोंबल म्हणावं ! बोंबलायची हौस होती नवं ! तिचा बोळा काढा, सोडा तिला, कशी नाचते ते बघू दे. रांड मला दम देत होती.''[१५] यावरून

एका दलित स्त्रीच्या जीवनाची वाताहत लेखकाने व्यक्त केली आहे. मुक्ताला सतत बदली व शेवटी बलात्काराला सामोरे जावे लागते. ती त्यांच्याविरूद्ध कोर्टात केस दाखल करते. परंतु उमाप पैसा खर्च करूनही खटल्याचा अंतिम निर्णय त्यांच्या बाजूनेच होतो. याचे कारण सरपंचाचे हात मंत्र्यापर्यंत पोहोचलेले असतात.

अशाप्रकारे दलित स्त्रीला मानाने जगण्याचा अधिकार मुळीच नाही हे या कादंबरीतून दिसून येते.

शेवंताच्या व्यक्तिचित्रणातून लेखकाने एका दलित व्यभिचारी स्त्रीचे रेखाटन केले आहे. शेवंताचे लग्न झाले आहे. परंतु काही कारणास्तव ती माहेरीच राहते. शेवंता पाण्याला गेल्यावर रुद्र तेल्याकडे पाहून हसते. याचा फायदा रुद्र घेतो आणि तिच्याशी उगीचच गोड-गोड बोलतो तो शेवंताला म्हणतो की,

''आज राती दुकान सारवायला ये. लई डिवळं निघाल्यात''

'रातीच ?' शेवंता हसून म्हणाली,

'दुकान बंद झाल्यावरच सारवण व्हनार ! खरं का नाई ?' आणि रुद्रने चक्क डोळा घातला.

शेवंता लाजली.

''बाला, सांगा.''[१६]

शेवंताच्या या संवादावरून एका दलित व्यभिचारी स्त्रीचे दर्शन घडते. त्याच दिवशी शेवंता रात्री उठून रुद्र तेल्याच्या दुकानाकडे जात असते, तेव्हा कुत्री भुंकायला सुरुवात करतात. तेव्हा आवाज ऐकून देवा आवाज देतो की, कोण आहे ? तेव्हा शेवंता म्हणते की, ''गुमान पड ! मी शेवंता''[१७]

या तिच्या बोलण्यावरून तिचा व्यभिचारीपणा दिसून येतो. शेवंताच्या हौसा व गौरी ह्या दोन बहिणी मुंबईला वेश्या व्यवसाय करीत होत्या. त्यांचा बाप विठू नाईक वारल्यावर हौसा, शेवंताला मुंबईला घेऊन जायला येते तेव्हा तुका तिला शेवंताला धंद्याला लावणार का ? म्हणून विचारतो, तेव्हा हौसा त्याला म्हणते की, ''तुकादा एकली बाईमाणूस इथं काय करणार ? कुनीबी ओरखडण्यापरीस आमच्या संग मुंबईला आली तर बेस ! उजळ तोंडानं धंदा तर करलं.''[१८]

हौसाच्या या संवादातून एका दलित स्त्रीच्या जीवनाची कोंडी व्यक्त होते. अशीच शोकांतिका सुशीलामावशीच्या जीवनाची होते. ती मुक्ताला आपली ओळख करून देताना सांगते की, लहान असतानाच तिचं लग्न झालं परंतु ती दिसायला सुंदर असल्यामुळे साऱ्यांची नजर तिच्यावरच असायची. दोन मुलं झाली तरी नवऱ्याचं वागणं बदलत नाही. तो सुशीला मावशीला एका श्रीमंताच्या ताब्यात द्यायला जातो. तेव्हा ती घर सोडून निघून जाते व तमाशात भाग घेते. अशाप्रकारे सुशीला मावशीच्या जीवनाची व्यथा स्पष्ट होते.

यावरून एका दलित स्त्रीच्या जीवनाची कहानी लेखकाने चित्रित केली आहे. एखाद्या सुंदर दिसणाऱ्या स्त्रीला तिचा नवरा पैशाकरीता एखाद्या श्रीमंताच्या हवाली करतो. यावरून त्याचा दुबळेपणा व असमर्थपणा दिसून येतो. अशा प्रकारे रणजित देसाई यांनी दलित स्त्रियांचे चित्रण मुक्ता, शेवंता व सुशीलामावशी यांच्या व्यक्तिचित्रणातून केले आहे.

## ३) 'समिधा'मधील धार्मिक जीवन :

'समिधा' कादंबरीमध्ये लेखकाने सर्व जाती-धर्माचा उल्लेख केला आहे. तसेच हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन व जैन या धर्मातील लोकांचा समावेश केला आहे. प्रत्येक धर्मातील लोकांच्या रुढी, परंपरा यांचे वर्णन या कादंबरीत येते. आंबेडकरी विचाराचा प्रभाव पडूनही या कादंबरीतील दलित समाजात देवा-धर्माचा पगडा जास्त दिसून येतो.

'समिधा' कादंबरीतील हरिजनवाडा हा परंपरेप्रमाणे गावाच्या एका बाजूला आहे. रस्ता अरुंद असल्यामुळे बैलगाडी जात नाही. पत्र्यांची, धाब्याची आणि खापरांची बसकी घरे आहेत. देवा हा पारंपरिक, जुन्या वळाचा असल्याने सवर्णांशी बोलताना तो अगदी लाचार, दुबळा होऊन बोलताना दिसतो. देवा यशवंत खोराटेला बऱ्याच दिवसानंतर दिसतो. जेव्हा खोराटे त्याला टोमणा मारतो तेव्हा देवा त्याला म्हणतो की,

"न्हाई धनी वारीला गेलो व्हतो"

"व्हय तुमी वाऱ्या करा आनी आम्ही इथं टाळ वाजवत बसतो !" यशवंतराव म्हणाले,

"तसं न्हाई ! तस न्हाई ! धनी चुक झाली पदरात घेवा !"[१९]

अशाप्रकारे देवाचा लाचारीपणा यावरून दिसून येतो. तसेच तो रुढी, परंपरा, जोपासताना दिसतो. त्याच्या बोलण्यात नेहमी 'न्हाई धनी', 'व्हय धनी', 'जोहार मायबाप' असे शब्द येताना दिसतात.

यावरून लेखकाने तत्कालीन दलित समाजातील लोकांचे जीवन प्रकट केले आहे. तत्कालीन समाजात सवर्णांबद्दल दलितांच्या मनात एक न्यूनगंड निर्माण झाला होता की ते आपल्यापेक्षा काहीतरी वेगळे आहेत. महान आहेत. त्यामुळे त्यांच्या दबावाखाली ही दलित मंडळी वागत-बोलत होती. दलितांना वाटायचे की जणू त्यांच्या जीवाचे ते मालक आहेत. त्यामुळे ते जे काय म्हणतील त्याप्रमाणे वागणे त्यांचा धर्म असे ते समजायचे.

'समिधा'तून धार्मिक रुढी-परंपरेप्रमाणे वर्षातील येणारे सण-उत्सव, जयंत्या मोठ्या उत्साहाने साजऱ्या केल्या जात होत्या यामध्ये होळीच्या यामध्ये सणाचे वर्णन लेखकाने अगदी वास्तविक रेखाटले आहे. ग्रामीण भागात ज्या पद्धतीने होळीचा सण साजरा होतो अगदी त्याचप्रमाणे होळीचा सण 'समिधा' या कादंबरीत साजरा झाल्याचे दिसून येते. या कादंबरीत दलित समाजात होळीचा सण मोठ्या आनंदाने, उत्साहाने साजरा होताना दिसतो. होळीदिवशी होळी खेळतात. ग्रामीण भागात आजपर्यंतची चालत आलेली प्रथा म्हणजे सवर्णांची होळी ही दलितांची होळी पेटल्यानंतरच पेटते. दलितांच्या होळीतील विस्तव सवर्ण मोठ्या संख्येने वाजत-गाजत येऊन होळी पेटवून घेऊन जातात आणि त्या विस्तवानेच संपूर्ण गावातील होळ्या पेटवल्या जातात. दलितांच्या होळीतील विस्तव घेऊनच सवर्णांची होळी पेटली पाहिजे अशी धार्मिक परंपरा, हिंदू धर्मातील लोकांच्यामध्ये दिसून येते. हाच नियम या कादंबरीतील रानगावातील लोक पाळताना दिसतात. रानगावातील सवर्णांचे लक्ष हरिजनांच्या होळीकडे आहे. देवाला विस्तव घेऊन बोलावण्यात येते. होळी पेटवताना गुरव पुढे होतो आणि सुरुवात करतो.

''जय स्वामी महाराजा''

पायरीवर उभ्या असलेल्या देवाने साथ दिली.

व्हय स्वामी महाराजा ! गुरव एका सुराने गाऱ्हाणे घालत होता.

'रामचंद्रा, कल्लाणा, नरसीराम, हिराकमई, जकणी, चाळोबा, चवाट्या, गौळदेवा, भीमदेवा, तांबदेवा, मुरकेला, गावाडोसा, लक्ष्मी, काळम्मा.....'

देवाने परत साथ दिली, 'व्हय म्हाराजा !'

'भावकाई, मरगाई, मसणाई, म्हातराळा, हरा !'

'व्हय म्हाराजा !'

गुरवाने शेवटची प्रार्थना केली, 'देवा, चोर-चांडाळास्नी मारुन बाळ-गोपाळास्नी सुखी ठेव.'[२०]

अशाप्रकारे सरपंच नारळ फोडून अर्ध्या भकलात चार आणे टाकतो आणि ते भकल देवाच्या हाती देतो. देवा भकल घेऊन जमिनीला डोके लावून नमस्कार करतो. तो उठताच भगवंतराव म्हणतो की, 'कौल दे' त्यावेळी देवा म्हणतो 'व्हय म्हाराजा' आणि सरपंच देवाने आणलेला विस्तव घेऊन होळीवर ठेवतो. गवताची चूड घेऊन पंच होळी पेटवतात. होळीभोवती बोंब उठते. यावरून तत्कालीन समाज हा धार्मिक-रुढी परंपरेत किती गुंतलेला होता. याचे दर्शन घडते त्यातूनच अस्सल ग्रामीण जीवनचित्रण होताना दिसते.

तुका हा या कादंबरीचा दलित तरुण, नायक होळीभोवती भजन म्हणण्याकरीता पाहुणे आमंत्रित करतो. पेटी, तुणतुणे आणि मृदंग घेऊन ती मंडळी येतात. तुकाच्या या वर्तनातून तो आंबेडकरवादी विचाराचा असूनदेखील धार्मिक बंधनात भडकलेला दिसून येतो. तो धार्मिक नियम पाळताना दिसून येतो. यावरून

तो बौद्ध दलित असूनही दैववादी आहे. याचा प्रत्यय येतो. होळीभोवती जेव्हा भजनी मंडळी गोळा होतात तेव्हा होळीच्या उबेवर वाद्ये गरम करतात आणि भजनाला सुरुवात करतात की,

"आई भवानी तुळजाआई या हो या नमना !

.... .... .... .... .... ....

जोतीबांचा हात धरूनी भीम बाबा या ऽऽ"[२१]

स्वातंत्र्योत्तर काळात बौद्ध धर्माचा प्रसार होऊनही दलित समाज हिंदू धर्मातील नियम पाळताना दिसतो. त्यांना बाबासाहेब हे गुरु नसून परमेश्वर वाटतात. त्याचे विचार-आचार आचरणात आणण्यापेक्षा ते देवधर्म, पूजाअर्चा याकडे वळताना दिसतात. म्हणूनच ते इतर देवतांना आवाहन करताना बाबासाहेबांनाही त्यांच्यासोबत आवाहन करताना दिसतात.

'समिधा' कादंबरीत रानगावातील दलित तसेच सवर्ण लोक नेत्यांच्या, समाजसुधारकांच्या जयंत्या साजऱ्या करताना दिसतात. सवर्ण हे महात्मा गांधीजींना आपला बाबा, बाप समजतात तर दलित बाबासाहेबांना आपले बाबा समजतात. डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीदिवशी मिरवणुकीच्यावेळी एका दलित मुलाच्या हातून चुकून गांधीजींच्या पुतळ्याचा हात तुटतो. एवढ्याशा कारणावरून आपल्या बाबाचा हात म्हारड्यांनी तोडला म्हणून सवर्ण लोक हे दलितांच्या वस्तीवर दगडफेक करतात. हरिजनवाडा जाळतात. त्यामध्ये दोन माणसं मृत्युमुखी पडतात. दलित समाजातील स्त्रिया, मुलींना बेअब्रू करून विवस्त्र करून संपूर्ण शिवारभर पळवतात. आणि इथेच खऱ्या जातीय संघर्षाला सुरुवात होते.

'समिधा'मध्ये प्रत्येक धर्मातील लोक धार्मिक रुढी परंपरेनुसार पोशाख वापरताना दिसतात. हिंदू-मुस्लीम, ख्रिश्चन व जैन या धर्मातील लोकांचे पोशाख धार्मिक परंपरेनुसार आहेत.

हिंदू धर्मातील लोकांचा साधा पोशाख, अंगात सदरा, पायात धोतर आणि डोक्याला टोपी किंवा मुंडासे असा साधा पोशाख मुस्लीम धर्मात पुरुष चौकड्याची लुंगी, बनियान व डोक्याला गोल टोपी तर ख्रिश्चन धर्मातील स्त्री-पुरुष अंगात पांढरा झगा वापरतात. यावरून 'समिधा' मध्ये धार्मिक रुढी-परंपरा जोपासल्याचे दिसून येते. एकूणच धार्मिक परिस्थिती 'समिधा' मधून कशी दिसून येते याचे चित्रण येते.

## ४) 'समिधा'मधील आर्थिक परिस्थिती :

'समिधा' ही दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी एक घटनाप्रधान कादंबरी आहे. त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक राजकीय व धार्मिक परिस्थितीचा स्थूलमानाने उल्लेख लेखकाने केला आहे.

'समिधा'मधील दलित आपला उदरनिर्वाह करण्यासाठी मोल-मजुरी, बलुतेदारीची, गावगाड्याची कामे करताना दिसतात. कांदबरीतील नायकाचा बाप, देवा हा दलित माणूस. परंतु परंपरेने राखून ठेवलेली त्याला पोटापुरती जमीन आहे. त्या शेतीच्या जीवावरच आईविना पोरक्या असणाऱ्या दोन मुलांना देवा सांभाळतो. बायको कॉलराच्या आजाराने मरते तेव्हा तिच्या उत्तरकार्यासाठी यशवंत खोराटेकडून शंभर रुपये घेतो. देवाला त्याचे पैसे वेळेवर परत करणे जमत नाही. ही संधी पाहून देवाला त्याचं नालेपट्टीच शेत मी करतो म्हणून सांगतो आणि म्हणतो की, ''सा पोती

जुंधळं, दोन पोतीत बाजरी, बघ परवडतय का ?"[२२] यावरून तत्कालीन दलित समाजातील दलितांची कोंडी लक्षात येते. देवा जेव्हा त्याला नकार देतो तेव्हा खोराटे रागाने चार दिवसात व्याजासहीत पैसे परत मागतो. खोराटेच्या व्यक्तिचित्रणातून तत्कालीन सवर्ण लोकांचा कपटीपणा लक्षात येतो. अगदी पन्नास रुपयांकरीता देखील दलितांच्या जमिनी हिसकावून घेण्याची पद्धत त्यावेळी होती. हे लेखकाने चित्रित केले आहे.

देवाची जमीन खोराटेने घेऊन जी थोडी शिल्लक राहते त्यामध्ये देवा ज्वारी पेरतो. परंतु ज्वारी जेव्हा कणीस धरायला येते तेव्हा सरपंच तुकाने गाभन गाईला धोंडा मारल्याच्या कारणावरून त्याच्या पिकात जैनाची, तेल्याची व आपली जनावरं सोडतो. देवाच्या पिकाचा इस्कोट होतो. अशाप्रकारे दलितांने दलितच राहिले पाहिजे. त्यांना नेहमी दारिद्रयातच ठेवणे सवर्णांना समाधानाचे वाटते. त्यामुळे ते दलितांची कोंडी करतात. याचे चित्रण 'समिधा'मधून आले आहे.

तुका मुंबईला काही दिवस नोकरी करून पैसे घेऊन परत गावी येतो व खोराटेकडची आपली जमीन परत घेतो. दलित समाजातील लोकांना पोटापुरतीदेखील जमीन नसल्याने ते बलुतेदारीची काम करताना दिसतात. याचे चित्रण लेखकाने 'समिधा'मध्ये केले आहे. 'समिधा'मधील घरादारांचे चित्रण पाहिले तर दलित समाजजीवन समोर उभे राहते.

कादंबरीचा नायक तुका हा समाजासाठी दिलेल्या सवलतीचा फायदा घेऊन आपल्याा समाजातील लोकांना घरे बांधून देतो. समाजासाठी तक्क्या बांधतो. रस्ता करतो. समाजातील लोकांना बलुतेदारीची कामे करू न देता त्यांना रोजगार उपलब्ध करून देतो. अशा प्रकारे तुका समाजात प्रगती घडवून आणतो. तुकाच्या या

व्यक्तिरेखेतून एका नवीन दलित तरुण पिढीचे दर्शन घडते. स्वातंत्र्योत्तर दलित तरुण हा त्यावेळच्या प्रस्थापित समाजव्यवस्थेविरूद्ध लढतो व आपले हक्क, अधिकार मिळविण्याचा प्रयत्न करून मानाने जगण्याचा प्रयत्न करतो याचे दर्शन तुकाच्या माध्यमातून लेखकाने घडविले आहे.

सवर्णांची जनावरे ओढून पोट भरण्यापेक्षा कष्ट करून दोन वेळचे पोट भरणे तुकाला योग्य वाटते. कारण सवर्णांची घाण दलितांनी काढायची आणि त्यांनाच सवर्ण हीनतेची, अपमानाची वागणूक देतात. तुकाला हे पटत नाही. म्हणूनच बसवंत जैनाची म्हैस मेल्यावर त्याच्या दारात जमलेल्या आपल्या दलित बांधवांना हे काम करणे म्हणजे किती घाणेरडं आणि अपमानाचे काम आहे हे पटवून सांगतो आणि आंबेडकरांचे विचार त्यांना सांगतो आणि ते जनावर उचलण्यापासून त्यांना परावृत्त करतो. यावरून एका स्वातंत्र्योत्तर दलित पिढीचे दर्शन घडते.

अशाप्रकारे लेखकाने दलित समाजातील आर्थिक परिस्थितीचे दर्शन घडविले आहे. स्वातंत्र्यपूर्व जुनी दलित पिढी सवर्णांची पडेल ती कामे आपले कर्तव्य समजून करते आणि त्यावर आपला उदरनिर्वाह करताना दिसते. परंतु स्वातंत्र्योत्तर नवी दलित पिढी असे न करता स्वतःच्या कष्टाची भाकरी मिळवून खाणे मान्य करते. यावरून 'समिधा'मधील आर्थिक परिस्थितीचे दर्शन घडते.

## ५) 'समिधा'मधील राजकीय परिस्थिती :

रणजित देसाई यांनी 'समिधा' या कादंबरीमध्ये ग्रामीण भागातील तत्कालीन दलित समाजातील राजकीय परिस्थितीचे दर्शन घडविले आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भगवंतराव देशमुखाच्या विरूद्ध तुका उभा राहतो. राखीव जागेकरीता

भावकू आणि दुर्गा पवार अर्ज भरतात. तुका राखीव जागा असूनही स्वतंत्र लढायचं ठरवतो. रानगावात तीन पार्ट्या होतात. सर्वांनी एकत्र येऊन समझोता करून यादी करायचे ठरवतात. त्यामध्ये भोळे गुरुजी पुढाकार घेतात. परंतु त्याचा काही उपयोग होत नाही. कारण तुकाच्या प्रचारासाठी रावजी कांबळे पुढारी आणतो आणि लाऊडस्पीकरवरून भाषणे होतात. गावातून मिरवणूक काढण्यात येते. निवडणुकीच्या आदल्या रात्री पाण्यासारखी दारु वाटली जाते. साहेबलालच्या अड्ड्यावर दारुचा माल अपुरा पडू लागतो. गल्ल्या-गल्ल्यातून बकरी कापून जेवणं होऊ लागतात. हरिजनवाड्यातही तुका, विठू नाईकच्या घरी बकरं कापतो. निवडणुका होतात. परंतु भगवंतराव देशमुखाची पार्टी निवडून येते आणि तुकाचे डिपॉझिट जप्त होते. यावरून आर्थिक तसेच दादागिरी या दोन गोष्टीमुळे सवर्ण हे दलितांना पुढे येऊ न देता त्यांना मागे ढकलण्याचा प्रयत्न करतात. आर्थिक बळ आणि मुनष्य बळ कमी पडल्याने दलितांचे सवर्णांपुढे काही चालत नाही. याचे दर्शन 'समिधा'मधून घडते.

निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी यशवंत खोराटे तुकाला भेटतो आणि निवडणूक लढून समाधान झालं का असं विचारतो. परंतु तुका त्याला न डगमगता म्हणतो की, ही निवडणूक हारलो परंतु पुढची जिंकेन यावर यशवंत खोराटे तुकाला म्हणतो की, तीन वर्ष वाट बघ यावर तुका त्याला अगदी उर्मीने म्हणतो की, ''डोई गेल्या, तीन वर्स लै न्हाईत.''[२३]

यावरून सवर्णाच्या दादागिरीला न घाबरता हक्कासाठी, स्वातंत्र्यासाठी त्यांच्या विरूद्ध लढा देण्याची हिम्मत दाखवणाऱ्या एका दलित तरुणाचे चित्रण तुकाच्या माध्यमातून केले आहे.

रानगावचा हरिजनवाडा जेव्हा जाळला जातो तेव्हा तुका व भोळे गुरुजी तालुक्याला जाऊन कलेक्टर, प्रांतसाहेब, मामलेदार व मंत्री यांना घेऊन येतात. मंत्री विश्वासराव गावात आल्यावर तुका घडलेली सर्व परिस्थिती मंत्र्यांना फिरुन दाखवतो. मंत्रीदेखील तुकाच्या बोलण्याला साथ देतात व गावचा सरपंच भगवंतराव यांना रागावतात. तुका जेव्हा पाण्याची अडचण सांगतो तेव्हा विश्वासराव सगळ्यांसमोर जिल्हाधिकाऱ्याला म्हणतात की, ‘‘देश स्वतंत्र होऊन येवढी वर्षे झाली. येवढे कायदे झाले आणि त्यांची अंमलबजावणी अशी करता ? तुम्ही नालायक आहात. उद्यापासून गावची विहिर हरिजनांना खुली झाली पाहिजे.’’[२४]

यावरून मंत्री हा गोरगरिबांना न्याय देणारा आहे, त्याच्या बोलण्यावर रानगावचे दलित व तुका विश्वास ठेवतात. त्यामुळे ते आशावादी आहेत. भगवंतराव मंत्र्यांना सांगतात की, ती विहिर देवस्थान मालकीची आहे. तेव्हा विश्वासराव देवस्थत्तनच जप्त करण्यास सांगतात. भगवंतराव विश्वासरावांना म्हणतात की, तुम्ही असे केले तर गावच्या जैन, लिंगायत व ब्राह्मणांनी पाणी प्यायला कुठे जायचे ? तेव्हा विश्वासराव त्यांना ज्या तालीच पाणी आजतागायत हे हरजिन लोक पितात ते पाणी पिण्यास सांगतात. तुका व इतर दलित व्यक्तींच्यासमोर विश्वासराव त्यांच्या केवळ समाधानासाठी भगवंतरावांचा अपमान करत होते व रागवत होते. त्यांचे इतरांसमोर नाटकच चाललं होतं. यावरून राजकारणी खेळी दिसून येते.

गावापासून पंधरा-वीस मैल अंतरावर असणाऱ्या विश्रामगृहामध्ये मंत्री विश्वासराव जेव्हा विश्रांतीसाठी जातात तेव्हा भगवंतरावांना विश्वासराव म्हणतात की, ‘‘या भगवंतराव आम्हाला जरा सोबत द्या. अहो आम्ही बोललो म्हणून राग

मानू नका, नुसते सरपंच म्हणून का आयुष्य काढणार ? आम्ही तुम्हाला उद्याचे आमदार, आमच्या मंत्रीमंडळाचे सहकारी म्हणून बघतो, समजल ?''[२५] यावरून एका कपटी, धूर्त मंत्र्याचे चित्रण लेखकाने 'समिधा' मधून केले आहे. मंत्र्यांची राजकारणी खेळी या चित्रणातून दिसून येते. मोठ्यांच्या राजकारणामध्ये गरीबांचा बळी जातो याचा प्रत्यय 'समिधा' कादंबरीतील राजकीय परिस्थितीतून येतो. आपल्या प्रतिष्ठेसाठी गोर-गरिबांवर अन्याय करताना ही मंत्रीमंडळी दिसतात.

अशा प्रकारे रणजित देसाई यांनी 'समिधा' कादंबरीतून तत्कालीन राजकीय परिस्थितीचे चित्र रेखाटले आहे. रानगावचा सरपंच भगवंतराव याचे मंत्र्यापर्यंत हात पोहोचल्यामुळे तुकासारख्या गरीब तरुणाचा बाप व त्याच्या बहिणीची मुक्ताची अब्रू लुटूनही निर्दोष सुटतो. यावरून 'समिधा'मधील राजकीय परिस्थितीचे दर्शन घडते.

### ६) 'समिधा' मधील शैक्षणिक परिस्थिती :

रणजित देसाई यांनी 'समिधा' कादंबरीमध्ये स्वातत्र्योत्तर व स्वातंत्र्यपूर्व दलित पिढीतल्या शैक्षणिक परिस्थितीचे चित्रण लेखकाने केले आहे. तसेच मुक्ताच्या माध्यमातून दलित स्त्रीच्या शैक्षणिक परिस्थितीचे चित्र रेखाटले आहे.

'समिधा'मधील दलित समाज हा शिक्षणापासून वंचित आहे. गावचा सरपंच सुशिक्षित असूनही त्याची प्रवृत्ती नीच आहे. स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. बाबासाहेबांनी दलित तरुण पिढीला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा !' असा संदेश देऊनही दलित तरुण पिढी अशिक्षितच आहे हे चित्र लेखकाने तुकाच्या व्यक्तिरेखेतून उभे केले आहे. तुका हा केवळ रावजीकाकाच्या सहवासात राहिल्याने त्याला आत्मभान येते आणि सवर्णांकडून आपल्या समाजावर होणाऱ्या अन्याय-

अत्याचाराची जाणीव होते. म्हणूनच तो समाजातील इतर तरुणांना त्यांच्याविरूद्ध लढण्यासाठी संघटित करतो. डॉ. बाबासाहेबांचे विचार पटवून देतो. तुका हा जरी सुशिक्षित नसला तरी तो आंबेडकरांच्या विचाराने जागृत झाला आहे. हे दिसून येते.

कादंबरीची नायिका मुक्ता ही जेव्हा शाळेत येत नाही हे फादर जॉनला समजते तेव्हा तिच्या बापाला मुक्ताला शाळेत पाठवायला पाहिजे असं सांगतो. तेव्हा देवा म्हणतो की, ''बाबा, मुक्ता आता थोर झाली. तिचं लगीन करायला पायजे.''[२६] देवाच्या या बोलण्यावरून स्वातंत्र्योत्तर काळातही दलित समाजातील मुलींची लहान वयातच लग्नं लावली जात होती. म्हणजेच दलित समाजात बालविवाह होत होते याचे दर्शन 'समिधा'मधून घडते. आठ वर्षाच्या मुक्ताचे देवा लग्न लावून द्यायचे म्हणतो. यावरून त्याचा अशिक्षितपणा दिसून येतो. देवाला आणखी एका गोष्टीची भीती वाटते ती म्हणजे मुक्ता ख्रिश्चन हायस्कूलमध्ये शिकते. त्यामुळे फादर जॉन तिचा धर्म बदलतील. तेव्हा फादर जॉन त्याची समजूत काढतात आणि सांगतात की, मुलगी हुशार आहे तिला शिकव. तेव्हा देवा म्हणतो की, ''झालं तेवढं रेट झालं. बाबा, आता ही थोराड झाली नवरा मिळायला मारामार आणि आनी शिकवू म्हणतासा.''[२७] यावरून देवा हा अशिक्षित, अडाणी असल्याने तो परंपरावादी आहे. त्यामुळे तो मुक्ताच्या काळजीत असल्याचे दिसून येते. मुक्ताला शिक्षण न देण्याच्या देवाच्या निर्णयाला तुकाचा विरोध आहे. तो आधुनिक विचाराचा असल्याने, मुक्ताला नर्स करण्याची फादर जॉनला हमी देतो.

मुक्ताच्या माध्यमातून लेखकाने दलित समाजातील स्त्रियांची शैक्षणिक स्थिती रेखाटली आहे. दलित समाजातील मुलींचे लहान वयातच लग्न लावून देण्याची प्रथा होती. याचे चित्रण 'समिधा'मधून आले आहे. अशा प्रकारे दलित

समाज हा शिक्षणापासून वंचित असल्याने सवर्णांच्या अन्याय-अत्याचाराला तो बळी पडताना दिसतो.

**समारोप :**

रणजित देसाई यांनी 'समिधा' या कादंबरीमध्ये दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. तसेच रानगावच्या संपूर्ण दलित समाजाचे दर्शन घडविले आहे. त्या समाजातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय तसेच शैक्षणिक परिस्थितीचे चित्रण लेखकाने केले आहे. तसेच देसाई यांनी दलित समाजातील स्त्रियांचे जीवन चित्रित केले आहे. त्यांनी चित्रित केलेल्या समाज दर्शनातून वास्तव दलित चित्रण आल्याचे जाणवते. देसाई यांनी कादंबरीतील प्रत्येक घटना-प्रसंगाची मांडणी विचारपूर्वक केली आहे.

लेखकाने स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील दलित पिढीचे समाजजीवन रेखाटले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजजीवन हे पारंपरिक, रुढी, परंपरा, अंधश्रद्धा जोपासताना दिसते, तर स्वातंत्र्योत्तर काळातील दलित जीवन हे आधुनिक विचाराने जगणारे दिसते. लेखकाने सामाजिक जीवनचित्रण रेखाटताना समाजातील सर्व घटकांवर नजर टाकली आहे. तरुण पिढीतला दलित तरुण स्वातंत्र्यासाठी, हक्कासाठी कितीही लढला तरी त्याला त्याच्या इच्छाअपेक्षांना हाणून पाडण्याचे काम हे सवर्ण लोक करतात. याचे चित्रण लेखकाने तुकाच्या माध्यमातून रेखाटले आहे.

'समिधा' कादंबरीमध्ये लेखकाने दलित स्त्रीच्या जीवनाचे चित्रण मुक्ता, शेवंता व सुशीला मावशीच्या व्यक्तीचित्रणातून केले आहे. एखादी दलित स्त्री ही सुशिक्षित असली व दिसायला सुंदर असेल तर तिचा वापर हा सवर्णीयांनी केलाच

पाहिजे. तिला समाजात मानाने जगण्याचा कुठलाही अधिकार नाही याचे चित्रण कादंबरीची नायिका मुक्ताच्या माध्यमातून केले आहे. तसेच एका दलित व्यभिचारी स्त्रीचे दर्शन शेवंताच्या माध्यमातून घडविले आहे आणि एका दलित स्त्रीच्या जीवनाची शोकांतिका कशी व का होऊ शकते याचे दर्शन सुशीलामावशीच्या व्यक्तीचित्रणातून घडविले आहे. सवर्ण हे दलित स्त्रियांकडे एक भोगवस्तू म्हणून पाहतात. हे या कादंबरीतून सूचित होते. लेखकाने दलित व सवर्ण यांच्यामध्ये होणाऱ्या संघर्षाचे चित्रण या कादंबरीतून केले आहे.

अशा प्रकारे 'समिधा' कादंबरीतील दलित समाजजीवनाचे दर्शन लेखकाने घडवून आणले आहे.

-----

# संदर्भ ग्रंथ सूची


१) देशपांडे, कुसुमावती : 'पासंग', मौज प्रकाशनगृह, मुंबई, चौथी आवृत्ती, एप्रिल, १९८७, पृ.क्र. ७७.

२) तेन, एच.ए. : 'मराठी साहित्यातील स्पंदने', (कुलकर्णी गो.म.) सुवर्ण प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९८५, पृ.क्र. ७.

३) देसाई, रणजित : 'समिधा', अजब पुस्तकालय, कोल्हापूर दुसरी आवृत्ती, १९८१, पृ.क्र. १७.

४) तत्रैव,

५) तत्रैव, : पृ.क्र. ७७.

६) तत्रैव, : पृ.क्र. १२४.

७) तत्रैव, : पृ.क्र. ९६.

८) तत्रैव, : पृ.क्र. ९७.

९) तत्रैव, : पृ.क्र. १०७.

१०) तत्रैव, : पृ.क्र. ११२.

११) तत्रैव, : पृ.क्र. ६६.

१२) डॉ. माळी, जी.पी. : 'रणजित देसाई : जीवन आणि साहित्य', शब्दवेल प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ.२००१, पृ.क्र. ९८.

१३) देसाई, रणजित : उनि., पृ.क्र. १३४.

१४) तत्रैव, : पृ.क्र. १४५.

१५) तत्रैव, : पृ.क्र. १५१.

१६) तत्रैव, : पृ.क्र. ४७.

१७) तत्रैव, : पृ.क्र. ४९.

१८) तत्रैव, : पृ.क्र. १३८.

१९) तत्रैव, : पृ.क्र. १७.

२०) तत्रैव, : पृ.क्र. ७३, ७४.

२१) तत्रैव, : पृ.क्र. ७५.

२२) तत्रैव, : पृ.क्र. १९.

२३) तत्रैव, : पृ.क्र. १०१.

२४) तत्रैव, : पृ.क्र. १२४.

२५) तत्रैव, : पृ.क्र. १२६.

२६) तत्रैव, : पृ.क्र. ३८.

२७) तत्रैव, : पृ.क्र. ८२.

-----